# पंचायत समिती,शहापूर

| अ.क्र. | स्वरूप | माहिती |
|---|---|---|
| 1. | विभागाबद्दल माहिती | भारतामध्ये सर्व प्रथम 1986 साली केंद्रीय पुरस्कृत **ग्रामीण परिसर स्वच्छता कार्यक्रम** (Central Sponsored Rural Sanitation Program) सुरु झाला . नंतर या कार्यक्रमाची सन २० ऑगस्ट २००३ या वर्षामध्ये **संपुर्ण स्वच्छता अभियान** (Total Sanitation Campaign) या नावाने केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री मा .श्रीम .सुर्यकांता पाटील यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. तदनंतर सन २००३-२०११ या कालावधीत जिल्हयात संपुर्ण स्वच्छता अभियान या नावाने राबविण्यात आले. त्यानंतर दिनांक १/४/२०१२ या तारखेपासून संपुर्ण स्वच्छता अभियानाचे **निर्मल भारत अभियान** (Nirmal Bharat Abhiyan) असे नामकरण करण्यात आले. त्यावेळेस ठाणे जिल्हयाचा )ठाणे व पालघर (सर्व्हे करण्यात आला .त्यांनतर ०१ ऑगस्ट २०१४ मध्ये ठाणे जिल्हयाचे विभाजन करण्यात आले होते .२ ओक्टोबर २०१४ रोजी या अभियानाचे नामकरण देशाचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अशी करण्यात आली. आणि या उपक्रमाचे अत्याधुनिकरण करण्यासाठी स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ म्हणून संबोधिण्यात आले. |
| **1.1** | **परिचय** | ठाणे जिल्हा मुंबई पासुन जवळ आहे .ठाणे जिल्हाचा विचार करता हा जिल्हा औदयोगिकरणात अग्रेसर आहे व नागरीकरण झपाटयाने होत आहे तसेच आदिवासी बहुल जिल्हा म्हणुन ठाणे जिल्हयाची ओळख आहे .२०१२ च्या पायाभुत सर्वेक्षणानुसार ठाणे जिल्हयात एकुण ९१२२५ कुटुंबांकडे शौचालय सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले व त्यानुसार ३१ मार्च २०१७ रोजी सन २०१२ च्या पायाभुत सर्वेक्षणानुसार ठाणे जिल्हयातील ४२६ ग्रामपंचायती हागणदारी मुक्त घोषीत करण्यात आल्या. ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यात एकूण ११० ग्रामपंचायत आहेत व महसूल गाव २२२ आहेत. |
| | व्हिजन आणि मिशन | ग्रामपंचायत स्तरावर वैयक्तिक शौचालय बांधकाम केले जाते. तसेच ओला व सुका कचरा व्यवस्थापन साठी नाडेप व प्लास्टीक जाळी शेड आहेत. सांडपाणी व्यवस्थापनसाठी लीचपीट बांधण्यात आले आहेत. |
| | उद्दिष्टे कार्येमजकूर | स्वच्छ भारत मिशन ग्रा अंतर्गत गावातील प्रत्येक कुटूंबांकडे शौचालय सुविधा असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगे टप्पा २ अंतर्गत नवीन वाढीव कुटूंबांना शौचालय बांधकामासाठी व वापर करण्यासाठी प्रवृत्त केले जाते. तसेच सांडपाणी व घनकचरा अंतर्गत ओला सुका कचरा वेगळा केला जातो व त्याचे RECYCLE करणे. नाडेप मध्ये कुटूंबांचा ओला कचरा टाकणे व त्याचे खत तयार करणे. व तो खत शेतीसाठी उपयोगात आणणे. सांडपाणी साठी लीचपीट बांधकाम करुन पाणी जमीनीत मुरवणे तसेच त्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुर्नवापर करणे. जेणेकरुन रोगराईस आला बसला जाईल. |
| | प्रशासकीय सेटअप | कामाची अंमलबजावणी झाल्यानंतर अनुदान वितरीत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांचे मार्फत होते. कामाची अंमलबजावणी गावस्तरावर ग्रामसेवक मार्फत केली जाते त्यावर संनियंत्रण गटविकास अधिकारी पंचायत समिती यांचे असते. उपमुख्यकार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता हे पाणी व स्वच्छता विभाग यांच्या मार्फत कामे केली जातात. तालुकास्तरावर सहा.गटविकास अधिकारी व कार्यक्रम अधिकारी तसेच BRC CRC हे कामाची धुरा सांभाळतात. |